लोकमत

# नव्या पिढीने छत्रपतींच्या इतिहासातून प्रेरणा घ्यावी

## दौलत देसाई : पदभ्रमण मोहिमेसाठी तुकडी मार्गस्थ; महाराष्ट्र, गोवा, दिल्ली, कर्नाटकचे छात्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रूला उपलब्ध साधनसामग्री आणि काही शेकडो मावळ्यांच्या साहाय्याने छत्रपती शिवाजी महाराजांनी नामोहरम केले. मराठा साम्राज्य निर्माण करून इतिहास घडविला. नव्या पिढीने इतिहासाचा अभ्यास करून त्यापासून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन गुरुवारी जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी केले.

एनसीसी भवन येथून 'छत्रपती शिवाजी महाराज की जय', 'जय भवानी, जय शिवाजी' अशा घोषणा देत पन्हाळा, पावनखिंड, विशाळगड या छत्रपती शिवाजी पदभ्रमण मोहिमेसाठी पहिली तुकडी मार्गस्थ झाली. तत्पूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. एनसीसी गीतानंतर




कोल्हापुरातील एनसीसी भवन येथून गुरुवारी छत्रपती शिवाजी पदभ्रमण मोहिमेसाठी पहिली तुकडी मार्गस्थ झाली. या तुकडीला कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे व जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी ध्वज दाखवून मार्गस्थ केले.

जिल्हाधिकारी श्री. देसाई, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, ग्रुप कमांडर ब्रिगेडिअर आर. बी. डोगरा यांनी या तुकडीला ध्वज दाखवून मार्गस्थ केले.

यावेळी देसाई म्हणाले, घनदाट अरण्य, डोंगरवाटा, सतत पडणारा पाऊस आणि तितकाच घनदाट काळोख अशा प्रतिकूल परिस्थितीत सिद्दी जौहरसारख्या शत्रूला चकवा देत कुशल युद्धनीतीच्या जोरावर आणि अवघ्या काही मावळ्यांच्या साहाय्याने छत्रपती शिवाजी महाराजांनी पन्हाळ्यावरून आपली सुटका करून घेतली. हा प्रसंग इतिहास घडवून गेला. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या काळात साम्राज्य उभे केले. त्यांनी घडविलेला इतिहास छात्रांना प्रेरणा देणारा आहे.

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज जगातील महान योद्धे आहेत. गनिमी कावा, कुशल युद्धनीतीच्या जोरावर त्यांनी इतिहास घडविला. स्वराज्याचे ध्येय ठेवल्याने हा इतिहास घडला. जीवनात ध्येय ठेवल्यास इतिहास घडू शकतो, हे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने दाखवून दिले आहे. तत्कालीन प्रतिकूल परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांनी काही मोजक्या मावळ्यांच्या साहाय्याने ही मोहीम कशी फत्ते केली असेल, याचा सध्याच्या 'गुगल मॅप'च्या युगात विचार करा.

या तुकडीमध्ये महाराष्ट्र, दिल्ली, कर्नाटक आणि गोवा निदेशालयाचे छात्र सहभागी झाले आहेत. कर्नल आर. बी. होला यांनी पदभ्रमण मोहिमेची माहिती दिली. यावेळी निवृत्त कर्नल डी. पी. पी. थोरात, कर्नल राजेश शहा, कर्नल गुलशन चड्ढा, कर्नल के. के. मोरे, लेफ्टनंट कर्नल सुनील नायर, कॅप्टन अंकुश शर्मा उपस्थित होते.

लोकमत

रोमहर्षक लढती : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक क्रिकेट स्पर्धा

# पटियाला, रोहटक अंतिम फेरीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरु चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत गुरुवारी झालेल्या सामन्यात पंजाब विद्यापीठ, पटियाला संघाने लाला लजपतराय विद्यापीठ, हिस्सार संघावर, तर महर्षी दयानंद विद्यापीठ रोहटक संघाने जम्मू विद्यापीठ, जम्मू संघावर मात करीत अंतिम फेरीत धडक मारली. कुलगुरु चषकासाठी आज, शुक्रवारी पंजाबी विद्यापीठ, पटियाला विरुद्ध महर्षी दयानंद विद्यापीठ रोहटक यांच्यामध्ये अंतिम सामना होणार आहे.

## आज बक्षीस वितरण

शिवाजी विद्यापीठात सुरु असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कर्मचारी 'कुलगुरु चषक टी-२०' क्रिकेट स्पर्धेत आज, शुक्रवारी सकाळी ८.३० वाजता उपांत्य फेरीतील पराजित संघांमध्ये तिसऱ्या स्थानासाठी सामना होईल आणि दुपारी एक वाजता अंतिम सामने होणार आहेत. त्यानंतर बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर झालेल्या उपांत्य फेरीतील पहिल्या सामन्यात पंजाबी विद्यापीठ संघाने लाला लजपतराय विद्यापीठ हिस्सार संघावर सात गडी राखून विजय मिळविला. प्रथम फलंदाजी करताना पंजाबी विद्यापीठ संघाने २० षटकांत ७ गडी बाद १२८ धावा केल्या. यामध्ये प्रवीण सांगवान ४१, अमित कुमारने २६, विकास ठाकूरने १८ धावा केल्या. पंजाबी विद्यापीठ संघाने गोलंदाजी करताना परमिंदर सिंगने ३, प्रीतपाल सिंगने २ गडी, तर गुरविंदर पाल सिंगने १ गडी बाद केला.

प्रत्युत्तरादाखल खेळताना पंजाबी विद्यापीठ संघाकडूने १७ षटकांत तीन गडी राखून १२९ धावा केल्या. फलंदाजी करताना प्रीतपाल सिंगने नाबाद ५८ धावा, प्रेम प्रकाशने ३३ धावा केल्या. हरप्रीत सिंगने २५ धावा केल्या. गोलंदाजी करताना हिस्सार संघाच्या विकास खबेने ३ गडी बाद केले. 'सामनावीर'चा बहुमान प्रीतपाल सिंगला देण्यात आला.

उपांत्य फेरीतील दुसरा सामना महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहटक संघाने जम्मू विद्यापीठ, जम्मू संघावर १३६ धावांनी विजय मिळविला. प्रथम फलंदाजी करताना महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहटक संघावर २० षटकांत ५ गडी गमवून १९० धावा केल्या. गोलंदाजी करताना जम्मू विद्यापीठ संघाकडून बलवंत सिंगने ३२ धावांत ४ गडी बाद केले. प्रत्युत्तरादाखल खेळताना जम्मू विद्यापीठ, जम्मू संघाने २० षटकांत ९ बाद ५४ धावा पर्यंतच मजल मारली. जम्मू विद्यापीठ संघाकडून राजेश सलोधरा, विशाल सुदान या दोघांनी फक्त दुहेरी धावा केल्या. महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहटक संघाकडून दीपक कुमारने ३ धावांत ५ गडी बाद केले.

अमित गद्रे



## चंद्र-गुरू...

गुरुवारी सायंकाळी आकाशात चंद्र आणि सूर्यमालेतील मोठा ग्रह असलेल्या गुरूची पिधानयुती झाली. खगोलशास्त्रातील अतिशय महत्त्वाचे संयोजन म्हणून या पिधानयुतीचा उल्लेख केला जातो. चंद्र व गुरू यांच्यातील ग्रहणाचाच हा प्रकार आहे. यावेळी गुरू ग्रहाची तेजस्विता उणे ३.८७ होती. सूर्य मावळत असताना चंद्राची द्वितीयेची कोर व चंद्राच्या सावलीकडील भागाच्या कक्षेत आलेला गुरू अशी ही पिधानयुती घडून आली. पिधानयुती होण्याची रचना अवकाशात होत असली तरी उत्तर भारत, नेपाळ व तिबेट या भागातून पिधानयुती पाहण्याचा योग दुर्मिळ होता, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या स्पेस सेंटर विभागाचे प्रमुख डॉ. राजीव व्हटकर यांनी दिली.

# पंजाबी विद्यापीठ, 'महर्षी' अंतिम फेरीत

कोल्हापूर : येथील शिवाजी विद्यापीठात सुरु असलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी २० क्रिकेट स्पर्धेत पंजाबी विद्यापीठ, पटियाला आणि महर्षी दयानंद विद्यापीठ,रोहटक विद्यापीठ संघांनी अंतिम फेरीत प्रवेश केला.

गुरुवारी झालेल्या उपांत्य सामन्यांत पहिली लढत लालालजपतराय विद्यापीठ, हिसार विरुद्ध पंजाबी विद्यापीठ यांच्यात झाली. या सामन्यात हिसार विद्यापीठाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी केली. यामध्ये निर्धारित २० षटकांमध्ये ७ गड्यांच्या मोबदल्यात १२८ धावा केल्या. यात प्रवीण सांगवानने ४१ धावा केल्या. पंजाबीकडून परमिंदर सिंगने ३ बळी घेतले. उत्तरादाखल खेळताना पंजाबी विद्यापीठाने १७.३ षटकात ३ गड्यांच्या मोबदल्यात १२९ धावा करत विजय मिळवला. यामध्ये प्रितपाल सिंगने ५८ धावा केल्या. हिसारकडून विकासने ३ बळी घेतले. सामनावीराचा बहुमान पंजाबीच्या प्रितपाल सिंगला मिळाला. दुसरा उपांत्य सामना महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहटक विरुद्ध जम्मू विद्यापीठ जम्मू यांच्यात झाला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना रोहटक विद्यापीठ संघाने २० षटकात ५ गडी गमावत १९० धावा केल्या.

# हवा प्रदूषणाचे मोजमाप सुरू

कोल्हापूर टाइम्स टीम

लाइन बाजार येथील कचऱ्याच्या ढिगाला लागणाऱ्या आगीतून बाहेर पडणाऱ्या घातक वायूंमुळे होणारे हवा प्रदूषण मोजण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने बसवलेल्या मशिनचे काम सुरू करण्यात आले. त्याद्वारे २४ तासांत घेण्यात येणाऱ्या नमुन्यांमधून विषारी वायू व धुलीकणांचा अभ्यास केला जाणार आहे. अशा प्रकारची चाचणी प्रथमच केली जात आहे.

घनकचरा प्रकल्पामध्ये १५ लाख टन कचरा पडून आहे. त्याला आग लावण्यात येत असल्याने विषारी वायू बाहेर पडतात. या प्रकाराने नागरिकांना आजारांना तोंड द्यावे लागत होते. याबाबत कॉमन मॅन संघटनेचे अॅड. बाबा इंदूलकर यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना धारेवर धरले होते. तेथील हवा प्रदूषणाचे मोजमाप करावे व त्याचे निष्कर्ष जनतेसमोर जाहीर करावेत, अशी मागणीही केली. त्यानुसार मंडळाने शिवाजी विद्यापीठाकडून हवा प्रदूषण पातळी मापनाचे मशिन घेतले. त्याद्वारे हवेच्या प्रदुषणाचे नमूने घेण्यात येणार आहेत. मशिन कार्यरत झाले असून २४ तासांतील नमुने प्रयोगशाळेकडे पाठवून विषारी वायू व धुलीकणांचा अभ्यास केला जाईल. मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी प्रशांत गायकवाड यांच्या उपस्थितीत इंदूलकर, माजी नगरसेवक चंद्रकांत घाटगे, अमित अतिग्रे आदींनी पाहणी केली. दरम्यान, कचऱ्याला आग लागू नये व त्यातून विषारी वायू बाहेर पडू नयेत म्हणून महापालिकेने पाणी फवारण्याची यंत्रणा कार्यान्वित केली आहे.



वायू प्रदूषण मोजण्यासाठी कचरा प्रकल्पावर बसवलेले मशिन.

## प्रदूषण नियंत्रण मंडळाची अनास्था

कसबा बावडा परिसराला अनेक वर्षांपासून या समस्येने ग्रासले आहे. नागरिकांना विषारी वायूंचा त्रास होत असतानाही मंडळाला तेथे जाऊन हवा प्रदूषणाचे मापन करावे असे वाटले नव्हते. मागणीनंतर तशा प्रकारची मशिन्सही मंडळाकडे उपलब्ध नसल्याचे समोर आले. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाकडून मशिन आणून काम करावे लागत आहे असे सांगत इंदूलकर यांनी प्रदूषण मंडळाच्या अनास्थेविषयी खंत व्यक्त केली.

# 'तुकाराम बावांच्या गाथेचे निरुपण' पुस्तकाचे आज विद्यापीठात प्रकाशन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ संत तुकाराम अध्यासन मारुती भाऊसाहेब जाधव (तळाशीकर गुरुजी) कृत तुकाराम बावांच्या गाथेचे निरुपण भाग - १ व २ या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा शुक्रवार (दि. २९) रोजी दुपारी तीन वाजता शाहू सिनेट सभागृह येथे होणार आहे. ग्रंथांचे प्रकाशन संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या शुभहस्ते कुलगुरु प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. याप्रसंगी प्र-कुलगुरु डॉ. डी.टी.शिर्के, गाथेचे निरुपणकार मारुती जाधव, ज्येष्ठ लेखक डॉ. राजन गवस, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, प्रा. रणधीर शिंदे यांची प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

# छत्रपती शिवरायांचा इतिहास प्रेरणादायी

## जिल्हाधिकारी दौलत देसाई : शिवाजी ट्रेल ट्रेक मोहिमेला प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जगात अनेक ठिकाणी शिवाजी महाराजांची युध्दनीती अभ्यासली जाते. औरंगजेबसारख्या बलाढ्य शत्रूला काही मावळ्यांच्या सहाय्याने छत्रपती शिवाजी महाराजांनी नामोहरम केले. मराठा साम्राज्याची पायाभरणी करीत नवा इतिहास घडवला. त्यामुळे त्यांचा इतिहास कायमच प्रेरणादायी आहे, असे आवाहन जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी केले.

एनसीसी ५ महाराष्ट्र बटालियन यांच्यातर्फे शिवाजी ट्रेल ट्रेक कँम्पचे आयोजन करण्यात आले आहे. पन्हाळा ते विशाळगड अशी पदभ्रमंती या कॅम्पअंतर्गत आहे. या कॅम्पसाठी छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी अशा घोषणा देत शिवाजी पदभ्रमण मोहिमेसाठी एनसीसी छात्रांची पहिली तुकडी विशाळगडाच्या दिशेने रवाना झाली.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. एनसीसी गीतानंतर जिल्हाधिकारी देसाई, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, ग्रुप कमांडर ब्रिगेडीयर आर. बी. डोगरा यांनी या तुकडीला ध्वज दाखवून मार्गस्थ केले. यामध्ये महाराष्ट्र, दिल्ली, कर्नाटक आणि गोवा निदेशालयाचे छात्र सहभागी झाले आहेत.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज जगातील महान योध्दा आहेत. महाराजांनी आरमाराची उभारणी, युक्तीचा वापर, गनिमी काव्यांचे तंत्र याव्दारे स्वतंत्र युध्दनीती उभी केली. या युध्दनितीच्या जोरावर बलाढ्य शत्रूलाही पराभवाची धूळ चारली. स्वराज्याचे ध्येय ठेवल्याने हा इतिहास घडला. जीवनात ध्येय ठेवल्यास इतिहास घडू शकतो हे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कर्तृत्वाने दाखवून दिले आहे.

स्वागत, प्रस्ताविक कर्नल आर.बी. होला यांनी केले. यावेळी निवृत्त कर्नल डी.पी. पी. थोरात, कर्नल राजेश शहा, कर्नल गुलशन चड्ढा, कर्नल के.के. मोरे, लेफ्टनंट कर्नल सुनील नायर आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : एनसीसी ५ महाराष्ट्र बटालियनतर्फे शिवाजी ट्रेल ट्रेक मोहिमेसाठी पहिली तुकडी रवाना झाली. यावेळी एनसीसी छात्रांना झेंडा दाखवून मार्गस्थ करताना जिल्हाधिकारी देसाई, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, ग्रुप कमांडर ब्रिगेडिअर आर. बी. डोगरा आदी. (छाया : तय्यब अली)**

# शिवाजी विद्यापीठात रिमोट सेंन्सिग विषयावर कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ भूगोलशास्त्र अधिविभाग व कला विज्ञान व वाणिज्य सरकारी महाविद्यालय, मार्सेला, गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'रिमोट सेन्सिग अँड जीआयएस विथ अॅडव्हान्स्ड सर्व्हे टेक्नॉलॉजी' या विषयावरील सात दिवसीय कार्यशाळा नुकतीच झाली. प्रगत सर्वेक्षण तंत्रज्ञानासह सुदूर संवेदन व भौगोलिक माहिती प्रणाली या विषयांचे महत्त्व व उपयोग याची माहिती देऊन कार्यशाळेची सुरुवात झाली. कार्यशाळेमध्ये रिमोट सेन्सिग परिचय, जीआयएसची ओळख, प्रतिमा नोंदणी डिजिटायझेशन, थ्री डी जनरेशन व समोच्च विश्लेषण, जीपीएसची ओळख, गुगल अर्थ आणि भुवन डेटा पोर्टलचा परिचय या विषयाचा समावेश होता.

डॉ. पी. टी. पाटील, विद्या चौगुले, अभिजित पाटील, सुधीर पोवार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. पी. डी. राऊत आदी उपस्थित होते.

पुढारी

# पंजाबी विद्यापीठ अंतिम फेरीत

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

चुरशीच्या उपांत्य सामन्यात लाला लजपतराय विद्यापीठ हिस्सारच्या संघावर ७ विकेट्सनी मात करून पंजाबी विद्यापीठ पतियाळा संघाने 'कुलगुरू' चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. 'सामनावीर' म्हणून प्रितपाल सिंग याला गौरविण्यात आले.




शिवाजी विद्यापीठ आयोजित ही स्पर्धा विद्यापीठाच्या क्रीडा संकुलातील क्रिकेट मैदानावर सुरू आहे. गुरुवारपासून उपांत्य फेरीस सुरुवात झाली. पहिला उपांत्य सामना पंजाबी विद्यापीठ विरुद्ध लाला लजपतराय विद्यापीठ यांच्यात झाला. प्रथम फलंदाजी करत लाला लजपतराय संघाने २० षटकांत १२८ धावा केल्या. यात त्यांच्या प्रवीण सांगवानने ४१, अमित कुमारने २६, विकास ठाकूरने १८ धावा केल्या. पंजाबी विद्यापीठाच्या परमिंदर सिंगने ३, प्रितपाल सिंगने २ विकेट्स घेतल्या. उत्तरादाखल पंजाबी विद्यापीठाने ३ विकेट गमावून १२९ धावांसह विजय मिळवत अंतिम फेरीत धडक दिली. त्यांच्या प्रितपाल सिंगने नाबाद ५८, प्रेम प्रकाशने नाबाद ३३, हरप्रित सिंगने २३ धावा केल्या. लजपतराय विद्यापीठाच्या विकास खर्वने तीनही विकेट घेतल्या.

# महर्षी दयानंद विद्यापीठ अंतिम फेरीत

## कुलगुरू चषक टी-२० चषक क्रिकेट स्पर्धा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित अखिल भारतीय आंतर कर्मचारी कुलगुरू टी-२० चषक क्रिकेट स्पर्धेच्या गुरुवारी झालेल्या उपांत्यपूर्व सामन्यात महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहटक संघाने जम्मू विद्यापीठ संघाचा १३६ धावांनी पराभव करत अंतिम फेरी गाठली. दयानंद संघाचा नरेंद्र कुमार याला सामनावीरचा किताब मिळाला. विद्यापीठाच्या पॅव्हेलियन मैदानावर झालेल्या या सामन्यात दयानंद विद्यापीठ संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ५ बाद १९० धावा केल्या. यात दयानंद विद्यापीठाच्या नरेंद्र कुमार याने ६३ चेंडूंत १११ धावा केल्या. जम्मू संघाच्या बळवंत सिंघने ३२ धावांत ४ बळी टिपले. धावांचा पाठलाग करताना जम्मू संघाने २० षटकांत ९ बाद ५४ धावा केल्या. दयानंद विद्यापीठाच्या दीपक कुमार याने ३ धावात ५ बळी मिळवले आणि आपल्या संघाला एकहाती सामना जिंकून दिला.

# कचऱ्यातील वायू उत्सर्जनाची तपासणी

## झूम प्रकल्पावर मॉनेटरिंग यंत्रणा कार्यान्वित

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

कसबा बावडा येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पातील कुजलेल्या कचऱ्यातून व आगीमुळे होणाऱ्या वायू उत्सर्जनाची तपासणी करण्यात येणार आहे. त्यासाठी प्रकल्पस्थळी महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने पी. एम. १० मॉनेटरिंग मशीन बसवली आहे. येथे कॉमन मॅन संघटनेचे पदाधिकारी, प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी भेट देऊन पाहणी केली.

कचरा प्रकल्प परिसरात अनेक वर्षांपासून अंदाजे १५ लाख टन कचऱ्याचे डोंगर झाले आहेत. या कचऱ्यास आग लागून धूर पसरत आहे. यातून विषारी वायू हवेमध्ये मिसळत आहेत. त्यामुळे परिसरातील लोकांना अनेक आजारांना तोंड द्यावे लागत आहे. याबाबत कॉमन मॅन या संघटनेने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाला धारेवर धरले होते. येथे मॉनेटरिंग मशीन बसवण्याची मागणी केली होती. याची दखल घेऊन बुधवारी



**कोल्हापूर : कसबा बावडा येथील घनकचरा प्रकल्पावर बसवण्यात आलेले पी. एम. १० मॉनेटरिंग मशीन. (छाया : एस. अली)**

(दि. २७) संध्याकाळी मॉनेटरिंग मशीन बसवण्यात आले. ते शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाकडून उपलब्ध करून घेतले आहे.

▶▶ पान २ वर

# कचऱ्यातील वायू उत्सर्जनाची तपासणी

हे यंत्र २४ तास कार्यान्वित ठेवून त्यातून जमा केलेले सॅम्पल्स शासकीय प्रयोगशाळेकडे पाठवण्यात येणार आहे. त्यातील विषारी वायूच्या व धूलिकणांचा अभ्यास केला जाणार आहे. त्याचा अहवाल पर्यावरणशास्त्र विभागाकडून प्रदूषण मंडळाला प्राप्त होईल. गुरुवार (दि. २८) प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी प्रशांत गायकवाड, कॉमन मॅन संघटनेचे ॲड. बाबा इंदूलकर यांनी घनकचरा प्रकल्पाची पाहणी केली.

## कचऱ्यावर पाणी फवारणी

कचऱ्याच्या डोंगरावर आणि आजूबाजूच्या परिसरात एसटीपी प्लॅन्टमधील पाणी फवारण्याची सूचना कॉमन मॅन संघटनेने केली होती. त्याची दखल घेऊन प्रकल्प स्थळी आणि एसटीपी प्लॅन्टमध्ये पाईप टाकण्यात आली आहे. त्यातून कचऱ्यावर एसटीपीतील पाणी फवारण्याची यंत्रणा सुरू केली आहे. त्यामुळे आग लागण्याचे प्रमाण कमी होऊन त्यातील धुरामुळे हवेत मिसळणारे विषारी वायूच्या घटना बंद होणार असल्याचे ॲड. बाबा इंदूलकर यांनी सांगितले.

# महर्षी दयानंद, पंजाब विद्यापीठ अंतिम फेरीत

## प्रीतपाल सिंग, नरेंद्र कुमार सामनावीर

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठ येथे सुरू असणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी २० क्रिकेट स्पर्धेत पंजाब विद्यापीठ, पटियाला आणि महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहटकने अंतिम फेरीत प्रवेश केला. उपांत्य सामन्यामध्ये पहिला सामना लालालजपत राय विद्यापीठ, हिसार विरूद्ध पंजाबी विद्यापीठ, पटियाला यांच्यामध्ये झाला.

या सामन्यात हिसार विद्यापीठाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी केली. यामध्ये निर्धारित २० षटकांमध्ये ७ गड्यांच्या मोबदल्यात १२८ धावा केल्या. यामध्ये प्रवीण सांगवान याने ४१ धावा केल्या. पटियालाकडून परमिंदर सिंग याने ३ बळी घेतले. उत्तरादाखल खेळताना पटियाला विद्यापीठाने १७.३ षटकात तीन गड्यांच्या मोबदल्यात १२९ धावा करत सामन्यात विजय मिळवला. पटियालाकडून प्रितपाल सिंग याने ५८ धावा केल्या. हिसारकडून विकास याने ३ बळी घेतले. सामनावीराचा बहुमान पटियालाच्या प्रितपाल सिंग याला मिळाला. दुसरा उपांत्य सामना महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहटकविरुद्ध जम्मू विद्यापीठ जम्मू यांच्यामध्ये झाला.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना रोहटक विद्यापीठ संघाने २० षटकात ५ बाद १९० धावा केल्या. यामध्ये नरेंद्र कुमार याने ६३ चेंडूत १११ धावा केल्या. जम्मू विद्यापीठाकडून बलवंत सिंग याने ४ बळी घेतले. उत्तरादाखल खेळताना जम्मूचा संघ निर्धारित २० षटकात ९ गड्यांच्या मोबदल्यात ५४ धावाच करू शकला. राजेश सालोथरा याने १२ धावा केल्या. रोहटककडून दीपक कुमार याने ५ बळीघेतले. रोहटकच्या नरेंद्र कुमार याला सामनावीराचा बहुमान मिळाला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 NOV 2010
तरुण भारत

# पंजाबी-रोहतक विद्यापीठ जेतेपदासाठी आमनेसामने

## आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० स्पर्धा : आज तिसऱ्या क्रमांकासाठी जम्मू-हिस्सार संघात रंगणार लढत

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर गुरुवारी झालेल्या कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत गुरुवारी झालेल्या उपांत्य सामन्यात पंजाबी विद्यापीठ पटियालाने लाला लजपतराय विद्यापीठ हिस्सार (हरियाणा) संघावर ७ विकेटने तर महर्षि दयानंद विद्यापीठ रोहतकने जम्मू विद्यापीठ संघावर १३६ धावांनी मात करून अंतिम फेरीत धडक मारली.

पहिल्या उपांत्य सामन्यात पंजाबी विद्यापीठ पटियालाने लाला लजपतराय विद्यापीठ हिस्सार (हरियाणा) वर ७ विकेटने मात केली. यामध्ये प्रथम फलंदाजी करताना हरियाणा विद्यापीठाने ६ बाद १२८ धावा केल्या. यामध्ये प्रविण सागवानने ४१ तर अमित कुमारने २६ धावांची खेळी केली. गोलंदाजी करताना पंजाबी विद्यापीठाकडून परमिंदर सिंगने ३, प्रितपाल सिंगने २ तर गुरविंदर पाल सिंगने १ बळी घेतला. उत्तरादाखल खेळताना पंजाबी विद्यापीठ पतियाळाने १७.३ षटकात ३ बाद १२९ धावा केल्या. यामध्ये प्रितपाल सिंगने नाबाद ५१ चेंडूत ५८ धावा, प्रेम प्रकाशने नाबाद २३ धावात ३३ धावांची खेळी करून संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले. तर हरप्रित सिंगने २३ धावांची उपयोगी खेळी केली. हिस्सारकडून गोलंदाजी करताना विकास खर्बने ३ बळी घेऊन दिलेली एकाकी झुंज पंजाबीच्या फलंदाजांनी व्यर्थ ठरविली.

### रोहतकचा १३६ धावांनी मोठा विजय

दुसऱ्या उपांत्य सामन्यात रोहतक विद्यापीठाने जम्मू विद्यापीठावर १३६ धावांनी मोठा विजय संपादन केला. प्रथम फलंदाजी करताना रोहतक संघाने २० षटकात ५ बाद १९० धावा केल्या. यामध्ये नरेंद्रकुमार याने ६३ चेंडूत १११ धावा करून शतकी खेळी केली. जम्मू संघाकडून बलवंत सिंग याने ३२ धावात ४ बळी घेतले. उत्तरादाखल खेळताना जम्मू विद्यापीठ संघाला २० षटकात ८ बाद ५४ धावांपर्यंतच मजल मारता आली. यामध्ये राजेश सलोथरा यांनी एकाकी झुंज दिलेली झुंज व्यर्थ ठरली. गोलंदाजी करताना रोहतककडून दिपक कुमार याने ३ धावात ५ बळी घेऊन अर्धा संघ गारद केला. सामनावीरचा बहुमान रोहतकच्या नरेंद्रकुमार याला देण्यात आला.



कोल्हापूर : पहिल्या व दुसऱ्या उपांत्य सामन्यातील सामनावीर पंजाबी विद्यापीठाचा प्रितपाल सिंग व रोहतक विद्यापीठाचा नरेंद्रकुमार यांना महिला क्रिकेटपटू अनुजा पाटीलच्या हस्ते गौरविण्यात आले.

**आजचे सामने**

**तिसऱ्या क्रमांकासाठी :** सकाळी ९ वाजता - जम्मू विरुद्ध हिस्सार

**अंतिम सामना :** दुपारी १ वाजता - रोहतक विरुद्ध पंजाबी पतियाळा

**बक्षिस वितरण :** दुपारी ४ ते ५ - कुलगुरू देवानंद शिंदे यांच्या हस्ते होणार आहे

### प्रथमच अंतिम फेरीत दाखल

अंतिम फेरीत प्रवेश केलेले पंजाबी व रोहतक हे दोन्हीही विद्यापीठ कर्मचाऱ्यांचे संघ प्रथमच अंतिम फेरीत दाखल झाले आहेत. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी - २० क्रिकेट स्पर्धेत देशभरातील विद्यापीठांच्या कर्मचारी संघांनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेत विजयाची घोडदौड कायम राखत तुल्यबळ संघांवर मात करून दोन्ही संघांनी अंतिम फेरीत धडक मारली आहे. प्रथमच आलेल्या या दोन संघांमधील सामना रंगतदार होणार आहे.

### शिवाजी विद्यापीठाच्या विश्वनाथची डबल हॅट्रिक

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या कुलगुरू चषक टी २० क्रिकेट स्पर्धेत डबल हॅट्रिक साधण्यात विश्वनाथ वरुटे याने यश मिळविले. तो शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचा गोलंदाज असून त्याची डबल हॅट्रिक स्पर्धेत लक्षवेधी ठरली. तसेच वरुटे यांनी गोलंदाजी, फलंदाजी क्षेत्ररक्षणातील चमकदार कामगिरी बरोबर स्पर्धेचे वृत्तांकन, सामन्यांचा निकाल माध्यमांपर्यंत नियमितपणे पोहचविण्याची उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

- **प्रकाशन :** शिवाजी विद्यापीठ संत तुकाराम अध्यासन केंद्राच्या वतीने तुकारामांच्या गाथेचे निरूपण या ग्रंथाचे प्रकाशन. स्थळ : शाहू सिनेट हॉल, वेळ : दुपारी ३ वाजता.
- **क्रिकेट :** १७ वी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेची अंतिम फेरी. स्थळ : विद्यापीठातील क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुल. वेळ : सकाळी ८ पासून